# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 04/04/2023 (मंगळवार) सायंकाळ

---

### विनयभंग

**पो.स्टे. जलालखेडा :–** दिनांक १५/०३/२०२२ चे १०/०० वा. ते दिनांक ३१/०३/२०२३ चे ०८/०० वा. दरम्यान अल्पवयीन फिर्यादी/पीडिता वय १६ वर्ष ११ महिने ही अकराव्या वर्गात अरविंदबाबु देशमुख महाविदयालय भारसिंगी येथे शिक्षण घेत आहे. फिर्यादीला सावत्र आई असुन लहान सावत्र भाऊ आहे. फिर्यादीचे ईयत्ता १० वी पर्यंतचे शिक्षण हे संत कबीर विद्यालय, रोहणा येथे झालेले आहे तसेच फिर्यादीचे दहाव्या वर्गाचे बोर्डाची परीक्षा ही १५ मार्च ते २५ एप्रिल पावेतो होती दरम्याण फिर्यादीचे सेंटर सुद्धा संत कबीर विद्यालय, रोहणा परिक्षेकरीता होते संत कबीर विद्‌यालय, रोहणा येथे सकाळी १०.०० वा. पेपरला पायदळ जात असताना कॉलेजमधुन घरी जात असंताना कॉलेजचे गेटचे समोर येवुन **आरोपी नामे– शैलेश गुणवंत खजुरीया, वय २२ वर्ष, रा. मायवाडी ता. नरखेड जि. नागपूर** याने म्हटले की “तु माझे सोबत लग्न कर नाहीतर मी मरून जाईन, नाही तर तुझी बदनामी करीन” असे म्हणुन तो मोटर सायकल घेऊन निघुन गेला, त्यांनतर सुद्धा त्यांनी फिर्यादीला पाच ते सहा वेळा अशाचप्रकारे म्हटले होते. पेपर देण्यास जाते वेळी तो फिर्यादीचा नेहमी पाठलाग करून अशी धमकी नेहमी देत होता घटनेची माहिती फिर्यादीने आपल्या घरी वडीलांना दिली तसेच फिर्यादीने आपल्या कुटंबीयांसोबत पोलीस स्टेशन जलालखेडा येथे तक्रार दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३४२, ३५४ (ड), ५०६, भादवी सहकलम ८, १२ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि/मनोज चौधरी पो.स्टे. जलालखेडा मो. क्र. ८९७५७५५९६९ हे करीत आहे.

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. मौदा :–** दिनांक २९.०३.२०२३ चे सकाळी १०.०० वा. ते ०५.०० वा. दरम्यान पो.स्टे. मौदा हद्यीत फिर्यादी हे कामाला मुळ गावी बिहार येथे गेले होते. तेव्हा फिर्यादी यांची मुलगी वय २० व लहान मुलगी वय १६ वर्ष मौदा येथे हजर होते. तेव्हा दि २९.०३.२०२३ रोजी सायंकाळी ०५.०० वा. दरम्यान फिर्यादीची मोठी मुलगी हिने फोन करून सांगीतले की लहान मुलगी ही सकाळी १०.०० वा. दरम्यान कॉलेजला जाते म्हणुन सांगुन गेली परंतु ०५.०० वा. पर्यत घरी परत आली नाही फिर्यादीच्या मुलीला आरोपी नामे– **आरोपी नामे– रितिक वासनिक रा. डहाळी ता. मौदा जि. नागपुर** याने फुस लावुन पळवुन नेले आहे. तेव्हा काही वेळानी पोलीसांनी सांगीतले की तुमची मुलगी ही आरोपी सोंबत लग्न करून परत आली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे.  सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा ४४२ चांदेवार ९७६५२२१११६ हे करीत आहे.

## फसवणुक

**पो.स्टे. उमरेड** :— अंतर्गत १०० मी अंतरावरील मौजा तहसील कार्यालय समोर उमरेड येथे दिनांक ०२/०४/२०२३चे १५/०० वा. दरम्यान सौ. अंकिता चिंधुजी घुगल, रा. पेंढराबोडी, ता. भिवापूर हया तहसिल कार्यालय उमरेड येथे निवडणूक ओळखपत्राविषयी तक्रार घेवून फिर्यादी नामे— त्रिलोकचद ज्ञानेश्वर लांजेवार, वय ५६ वर्ष, रा. तहसील कार्यालय समोर उमरेड यांचे कडे आले होते. त्यांचेकडे चौकशी केली असता त्यांचे नाव मतदार यादीत नसल्याचे दिसून आले. त्यांना बॅकेचे कर्ज घेणे असल्यामुळे निवडणूक ओळखपत्राची आवश्यकता होती त्यामुळे त्या झेरॉक्स काढण्याकरीता तहसिल कार्यालय, उमरेड समोरील सलोनी नेट कॅफे व झेरॉक्स सेंटर येथे जावुन झेरॉक्स काढल्यात त्यापैकी दुकानदारास ऑनलाईन प्रक्रियेद्वारा मतदार यादीत नाव समाविष्ट करून निवडणूक ओळखपत्र प्राप्त करून घेण्याविषयी फिर्यादी यांनी विचारले. त्यावेळी दुकानदाराने मतदार यादीत नाव समाविष्ट करून निवडणूक ओळखपत्र तत्काळ बनवून देण्याचे चारशे रू. सांगीतले त्यावर फिर्यादी यांनी चारशे रू. दुकानदारास देवून त्याच दिवशी दुपारी ३.०० वा. चे सुमारास एसपीआर ५९२४३३७ या क्रमांकाचे मतदान ओळखपत्र सलोनी नेट कॅफे व झेरॉक्स सेंटर यांचेकडून प्राप्त केले व सदर कार्ड दि. २८/०३/२०२३ ला कर्ज मंजूर करून देण्याऱ्या बॅक एजंटला दाखविले असता त्यांनी ऑनलाईन तपासले असता सदर कार्ड बनावट असल्याचे सांगीतले. सदर प्रकरणात सलोनी नेट कॅफे व झेरॉक्स सेंटर चे दुकानचालक व मालक **आरोपी नामे— श्री गोवर्धन डोमाजी रामटेके, रा. जिंदल कॉम्लेक्स जोगीठापेट उमरेड** याने फिर्यादी यांना स्वत:च्या आर्थिक फायदयाकरिता खोटे व बनावट मतदान ओळखपत्र मतदार नोंदणी केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ४२०, ४६५, ४६६, ४६७, ४६५ भादवी. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि. दिनेश खोटेले मो. नं. ९४०४०८०६६६ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**